1,0 ५त

(54)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद ग्रामीण **P.S.(ठाणे):** फुलंब्री **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0300 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/11/2020 20:14 बजे

| 2. S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 04/11/2020

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 04/11/2020

**Time From (वेळेपासून):** 12:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:00 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 04/11/2020 **Time (वेळ):** 20:14 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 023 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/11/2020 20:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 0.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तहसिल कार्यालय फुलंब्री

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** फुलंब्री

**District(State) (जिल्हा(राज्य)):** औरंगाबाद ग्रामीण(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** दत्तात्रय फकीरबा शिंदे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सुलतानवाडी ता फुलंब्री ,फुलंब्री,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सुलतानवाडी ता फुलंब्री ,फुलंब्री,औरंगाबाद ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9373347871

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुरेश गंगाराम सदावर्ते | | | 1. शिवाजी नगर औरंगाबाद,सातारा, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद फुलंब्री, जि. औरंगाबाद.दि. 04/11/2020मी दत्तात्रय फकीरबा शिंदे, वय 22 वर्षे, व्यवसाय शेती, रा. सुलतानवाडी, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद. मोबाईल नं. 9373347871, 9881317557.समक्ष फिर्याद देतो की, मी वरील प्रमाणे राहत असून घरात आई- सौ. अलकाबाई फकीरबा शिंदे, वडील- श्री फकीरबा मोहन शिंदे, आज्जी, लहान भाऊ- विकास फकीरबा शिंदे यांच्यासह राहतो. मला सौ. अर्चना गणेश तुपे नावाची एक मोठी बहिण असून तिचे लग्न झालेले असल्याने ती तिच्या सासरी नरला, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद येथे राहते. आमच्या वरील कुटूंबियांची मौजे डोंगरगाव कवाड, ता. फुलंब्री शिवारात गट नं. 163/1 मध्ये शेत जमीन माझे वडील श्री फकीरबा मोहन शिंदे यांच्या नावावर आहे. सदर जमीनीचे वाटणी पत्र माझ्या व माझ्या लहान भावाच्या नावे करण्यासाठी प्रकरण मा. तहसीलदार, फुलंब्री यांच्या कार्यालयात दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात अंतीम सुनावणी झालेली असून त्याबाबत वाटणीपत्राचा आदेश अद्याप तहसील कार्यालय फुलंब्री येथून प्राप्त झालेला नाही. सदरचे काम तहसील कार्यालय फुलंब्री येथील श्री. सदावर्ते साहेब यांच्याकडे आहे.माझ्या कुटूंबियांच्या वरील प्रमाणे शेतजमिनीचे वाटणीपत्राचे आदेश प्राप्त करण्यासाठी मी वेळोवेळी तहसील कार्यालय फुलंब्री येथे गेलो. परंतू मला वाटणीपत्राच्या आदेशाची प्रत मिळाली नाही. त्यानंतर मी दिनांक 27/10/2020 रोजी पुन्हा तहसील फुलंब्री येथे जावून श्री सदावर्ते साहेब यांना माझ्या कामानिमित्त भेटलो. तेव्हा श्री सदावर्ते साहेब यांनी वाटणीपत्राच्या आदेशाची प्रत देण्यासाठी माझ्याकडे 15,000/- रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना नाईलाजाने हो म्हणून तेथून निघून आलो. त्यानंतर मी दिनांक 02/11/2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे फोन करुन पोलीस निरीक्षक श्री ढाकणे साहेब यांना तहसील कार्यालय फुलंब्री येथील श्री सदावर्ते साहेब माझ्याकडे मागणी करीत असलेल्या लाचे बाबत माहिती दिली. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद हे त्यांच्या स्टाफसह दिनांक 03/11/2020 रोजी दुपारी 13.45 वा. च्या सुमारास फुलंब्री येथे येवून एका सुरक्षित ठिकाणी मला भेटले. तेव्हा पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी मला त्यांचा तसेच त्यांच्यासोबत असलेले पोलीस स्टाफ व दोन पंच 1) श्री. माधवसिंग शिवसिंग बैनाडे, वय-51 वर्षे, व्यवसाय- नोकरी, शिपाई, वस्तु व सेवाकर कार्यालय, औरंगाबाद. रा. प्लट नं- 15, गट नं-148, प्रगतीनगर, सातारा परिसर, औरंगाबाद, 2) श्रीमती अंजली बाळकृष्ण पगारे, वय 40 वर्षे, व्यवसाय- नोकरी, राज्य कर निरीक्षक, वस्तु व सेवाकर कार्यालय, औरंगाबाद. रा. फ्लट नं 4, राजस अपार्टमेंट, बन्सीलाल नगर, औरंगाबाद अशांचा परिचय करुन दिला. तसेच माझा परीचय करुन घेतला. त्यानंतर मी माझी तक्रार दोन पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री ढाकणे साहेब यांना सांगीतली. ती त्यांनी लपटपवर तयार करुन त्याची प्रिंट काढली. सदर तक्रारीवर मी तसेच पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे व दोन पंचांनी सहया केल्या.त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. महादेव ढाकणे यांनी माझ्या व दोन्ही पंचाच्या संमतीने प्रस्तुत प्रकरणात पंचा समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेवुन सदर कारवाई दरम्यान व्हईस रेकर्डरचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री ढाकणे यांनी लाचमागणी पडताळणी

कारवाईस अनुसरुन मला तसेच दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य अशांना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यांनतर माझ्याकडे व्हाईस रेकर्डर सुरु करुन दिल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री ढाकणे यांच्या सुचनेप्रमाणे मी व पंच क्र. 1 श्री. बैनाडे असे माझ्या कडील मोटार सायकल क्र. एमएच 20 ईक्यु 1624 नेसुरक्षित ठिकाणाहून दुपारी 14.45 वा. च्या सुमारास निघून तहसील कार्यालय फुलंब्री येथे गेलो. तेथे माझी श्री सदावर्ते साहेब यांच्यासोबत भेट होऊन माझ्या कामाबाबत चर्चा झाली. तेव्हा श्री सदावर्ते साहेब, तहसील कार्यालय फुलंब्री यांनी माझ्याकडे 5000/- रुपये लाचेची मागणी केली. तेव्हा मी त्यांना काहीतरी कमी करा अशी विनंती केली. त्यानंतर श्री सदावर्ते साहेब यांनी मला ठिक आहे, चार हजार घेवून ये, असे म्हणून 4,000/- रुपये लाचेची मागणी केली. तसेच सदर लाचेची रक्कम घेवून दिनांक 04/11/2020 रोजी तहसील कार्यालय फुलंब्री येथे येण्यास सांगीतले. तेव्हा मी त्यांना पैसे घेवून उदया येतो असे म्हणून पंच श्री. बैनाडे यांच्यासह सापळा पथक थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी दुपारी 15.25 वा. च्या सुमारास परत आलो. तेथे लाचमागणी पडताळणी वेळी व्हाईस रेकर्डरमध्ये रेकर्ड झालेले संभाषण मी तसेच पोलीस निरीक्षक श्री ढाकणे व दोन्ही पंचांनी ऐकले. त्यामध्ये श्री सदावर्ते साहेब, तहसील कार्यालय फुलंब्री यांनी माझ्याकडे 4,000/- रुपये लाचेची मागणी करुन दि. 04/11/2020 रोजी सकाळी तहसील कार्यालय फुलंब्री येथे घेवून येण्यास सांगीतले असल्याचे निष्पन्न झाले. तेव्हा पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी माझ्या व पंचांच्या संमतीने सदर प्रकरणी दिनांक 04/11/2020 रोजी सापळा लावण्याचा निर्णय घेतला. सदर कारवाईचा पंचनामा पुर्ण झाल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. महादेव ढाकणे हे त्यांचा स्टाफ व पंचांसह औरंगाबादला गेले. तसेच मी माझ्या घरी निघून गेलो.त्यानंतर आज दिनांक 04/11/2020 रोजी सकाळी 10.15 वा. च्या सुमारास पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे हे त्यांचा स्टाफ तसेच दोन पंच अशांसह फुलंब्री गावाजवळील एका नियोजित सुरक्षित ठिकाणी येवून मला भेटले. तेथे मी लाचेसाठी लागणारी रक्कम 4,000/- रुपये पोलीस निरीक्षक श्री ढाकणे यांच्याकडे दिली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री ढाकणे यांनी मला ऍन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवीले व सापळा कारवाईसाठी आवश्यक त्या सुचना दिल्या. तसेच श्री सदावर्ते यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर मी माझ्या तोंडाला बांधलेला रुमाल डाव्या हाताने सोडून हातात घेवून लाचेची रक्कम स्विकारल्या बाबत इशारा करावा अशी सुचना मला दिली. सापळा कारवाईसाठी लागणाऱ्या ऍन्थ्रासीन पावडर लावलेल्या लाचेच्या नोटा माझ्या पन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवुन व्हईस रेकर्डर माझे अंगावर कोणास दिसणार नाही अशा अवस्थेत ठेवले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी दिलेल्या सुचनांनुसार मी व्हाईस रेकर्डरसह पंच श्री बैनाडे यांच्यासोबत माझ्याकडील मोटारसायकलवर तसेच पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे, सापळा पथकातील अंमलदार व पंच क्र. 2 श्रीमती अंजली पगारे असे शासकीय वाहनात बसुन 11.05 वा. तहसील कार्यालय फुलंब्री येथे जाण्यासाठी रवाना झालो.तहसील कार्यालय फुलंब्री परीसरात आल्यानंतर मी तसेच पंच क्र. 1 श्री बैनाडे असे तहसील कार्यालयात जावून श्री सदावर्ते साहेब यांना भेटलो. तेव्हा सदावर्ते साहेबांनी मला त्यांनी थोडा वेळ थांबण्यास सांगीतले. त्यानंतर काही वेळाने श्री सदावर्ते साहेब माझ्याकडे आले व मला स्वच्छता गृहाकडे घेवून गेले. स्वच्छता गृहाचे आत गेल्यावर श्री सदावर्ते साहेब यांनी मला किती आणले असे विचारले. तेव्हा मी त्यांना 4,000/- रुपये आणल्याचे सांगीतले. तसेच माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवलेले 4,000/- रुपये उजव्या हाताने काढून त्यांच्यासमोर धरले असता श्री सदावर्ते साहेब यांनी लाचेची रक्कम 4,000/- रुपये त्यांच्या उजव्या हाताने स्वीकारुन त्यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर श्री सदावर्ते साहेब व मी स्वच्छता गृहातून बाहेर आलो. तसेच मी माझ्या नाका तोंडाला बांधलेला रुमाल माझ्या डाव्या हाताने सोडून हातात घेवून सापळा पथकाला दिसेल अशा रितीने लाच स्वीकारले बाबतचा इशारा केला. ती वेळ सुमारे दुपारी 12.00 वा. ची होती. तेव्हा श्री सदावर्ते साहेब चालत चालत त्यांच्या कक्षात आले. तेव्हा सापळा पथकाने पंच क्र. 2 श्रीमती पगारे मडम यांच्यासह तेथे येवून श्री सदावर्ते साहेब यांना पकडले व त्यांच्याकडून लाचेची रक्कम 4,000/- रुपये हस्तगत केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी त्यांचा परिचय करुन देत श्री सदावर्ते यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री सुरेश गंगाराम सदावर्ते, वय 51 वर्षे, व्यवसाय नोकरी, कनिष्ठ लिपीक, महसुल विभाग, तहसील कार्यालय फुलंब्री, जि. औरंगाबाद, रा. रो.हाऊस नं. 70, कासलीवाल भाग्योदय सोसायटी, शिवाजीनगर, औरंगाबाद असे सांगीतले. त्यानंतर श्री सुरेश सदावर्ते यांच्या हातांची तसेच कपडयांची अल्ट्राव्हयेलेट लम्पच्या प्रकाशात तपासणी केली असता श्री सुरेश सदावर्ते यांच्या उजव्या हाताच्या पाचही बोटांचे पे-यावर व तळहातावर ठिकठिकाणी तसेच नेसत्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशाच्या तोंडावर व आतमध्ये ठिकठिकाणी ऍन्थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. तसेच श्री सुरेश सदावर्ते यांच्या ताब्यातील लाचेच्या नोटा पंचांच्या समक्ष पडताळून पाहिल्या असता त्या सापळा कारवाईसाठी वापरण्यात आलेल्या नोटाच असल्याची खात्री झाली. तसेच सदर नोटांवर पंचांसमक्ष अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश टाकुन निरीक्षण केले असता त्यावर ऍन्थ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री महादेव ढाकणे यांनी श्री सुरेश सदावर्ते यांच्याकडे आमच्या वाटणीपत्राच्या फाईल बाबत चौकशी करुन सदरची फाईल श्री सदावर्ते यांच्याकडून ताब्यात घेतली.त्यानंतर आम्ही सर्वजन श्री सुरेश सदावर्ते यांच्यासह सदर प्रकरणी उर्वरित कारवाई करण्याकरीता ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय औरंगाबाद येथे परत आलो. श्री सुरेश गंगाराम सदावर्ते, कनिष्ठ लिपीक, तहसील कार्यालय फुलंब्री यांचेशी माझा कोणताही घेण्या-देण्याचा अगर उसनवारीचा व्यवहार नाही. तसेच त्यांच्याशी माझी वैर-दुश्मनी नाही. तरी आज दिनांक 04/11/2020 रोजी दुपारी 12.00 वा. च्या सुमारास तहसील कार्यालय फुलंब्री येथील स्वच्छता गृहात श्री सुरेश गंगाराम सदावर्ते, वय 51 वर्षे, व्यवसाय नोकरी, कनिष्ठ लिपीक, महसुल विभाग, तहसील कार्यालय फुलंब्री, जि. औरंगाबाद, रा. रो.हाऊस नं. 70, कासलीवाल भाग्योदय सोसायटी, शिवाजीनगर, औरंगाबाद यांनी माझ्याकडे माझ्या वडीलांच्या नावे मौजे डोंगरगाव कवाड, ता. फुलंब्री शिवारात असलेली शेत जमीन वाटणीपत्राव्दारे माझ्या व माझ्या भावाच्या नावे करण्याच्या सुनावणी आदेशाची प्रत मला देण्यासाठी माझ्याकडे तडजोडी अंती 4,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम माझ्याकडून स्वत: स्वीकारली म्हणून त्यांच्या विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.माझी वरीलप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केलेली फिर्याद माझ्या सांगण्याप्रमाणे मराठीत टंकलिखीत केली असून मी वाचून पाहिली. ती बरोबर व खरी आहे.समक्ष हि फिर्याद दिली सही

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): ASHOK Bansidhar SOKATAKAR

**Rank** (पद): HC (Head Constable)

**No.**(क्र.): POBN62234 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे, फुलंब्री.

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): BABASAHEB RAVAN KAMBLE

**Rank**(पद): SI (Sub-Inspector)

**No.**(सं.): PSI